प्रेस नोट दिनांक ०६/०९/२०१७

एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे कडील तपास पथकातील अधिकारी व कार्मचारी यांनी गणेशोत्सवा दरम्यान केलेली कामगिरी

१) एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणेकडील तपास पथकातील पोलीस नाईक किरण काटकर यांना मिळालेल्या बातमीवरुन चैनचोरी करणारे जोडपे ताब्यात घेण्यात आले आहे. १)सुनिल रामदास राठोड वय- ३२ वर्षे रा.आर्दशनगर, ओमप्रकाश पटेल यांच्या खोलीत भाडयाने, सत्यम मोबाईल शॉपीजवळ, मोशी, पुणे यास त्याची पत्नीसह ताब्यात घेवून त्याचेकडून **एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे गुन्हा रजि नं – २४४/२०१७ भादवि कलम ३७९ भोसरी पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ३७९/१७ भादवि कलम ३९२,३४** हा गुन्हा उघडकीस आला असून त्याचे पत्नीस पुढील कारवाई कामी भोसरी पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आले आहे. त्याचेकडून कि. ४५,०००/- रुपये किमतीची टी व्ही.एस.व्हिक्टर गाडी जप्त करण्यात आलेली आहे.

२) पेट्रोलिंग दरम्यान संशयित इसम नामे १)दिपक एकनाथ मुलगीर रा. सध्या - विश्वनाथ साळुंखे यांचे खोलीत, गणेश मंदीराजवळ, भगतवस्ती, हनूमाननगर, भोसरी, पुणे, २)किशोर उध्दव चिमटे रा. सर्व्हे नं. २३, हनुमाननगर, भगतवस्ती, भोसरी, पुणे यांना ताब्यात घेवून त्यांचेकडून कि. रु. ७०,०००/- चे ०६ मोबाईल फोन व एक ॲक्टीव्हा गाडी जप्त करण्यात आली असून त्यांचेकडून **एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे गुन्हा रजि नं – २४८/२०१७ भादवि कलम ३७९** उघडकीस आला आहे.

३) तडीपार इसम नामे चाँद गफुर शेख रा. फुलेनगर झोप. भोसरी पुणे पोलीस ठाणे, पुणे हा मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवून त्याचेवर मुबई पोलीस ॲक्ट १४२ नूसार कारवाई करण्यात आलेली आहे.

४) पेट्रोलिंग दरम्यान अल्पवयीन मुलास ताब्यात त्याचे कडून किं रु **२,०५,०००/-** किं च्या **०६ मोटार सायकल** व **१२ मोबाईल फोन** जप्त करण्यात आले असून

**१) एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे गुन्हा रजि नं – २४८/२०१७ भादवि कलम ३७९**
**२) विमानतळ पोलीस ठाणे पुणेशहर गुन्हा रजि नं – ३४४/२०१७ भादवि कलम ३७९**
**३) कोढवा पोलीस ठाणे पुणेशहर गुन्हा रजि नं – ३३३/२०१६ भादवि कलम ३७९**
**४) लोणीकंद पोलीस ठाणे पुणेग्रामीण गुन्हा रजि नं – ४६४/२०१७ भादवि कलम ३७९**
**५) शिक्रापूर पोलीस ठाणे पुणेग्रामीण गुन्हा रजि नं – ८८/२०१६ भादवि कलम ३७९**
हे गुन्हे उघडकीस आलेले आहेत

**असा एकुण किंमत रुपये ३,२०,०००/- रुपयेचे एकुण ०७ मोटार सायकल व १८ मोबाईल फोन हस्तगत करण्यात आला असून पुणे शहर व पुणे ग्रामीण कडील ०८ गुन्हे उघडकीस आले आहे.**

सदरची कामगिरी ही मा.पोलीस उपायुक्त श्री गणेश शिंदे तसेच मा.सहाय्यक पोलीस आयुक्त श्री.राम मांडुरके यांचे मार्गदर्शनाखाली MIDC भोसरी पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. भिमराव शिंगाडे व पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राजेंद्र विभांडीक, तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक रावसाहेब बांबळे, पोलीस हवालदार रविंद्र तिटकारे, अजय भोसले, पोलीस नाईक किरण काटकर, पोलीस शिपाई नवनाथ पोटे, करन विश्वासे, विशाल काळे, अमोल निघोट यांनी केली आहे. पुढील तपास पोलीस उप-निरीक्षक रावसाहेब बांबळे हे करीत आहेत.